दीपावली विशेषांक २०२३

ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक !

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक, शके १९४५ । वर्ष २४ अंक २
वार्षिक वर्गणी ₹ २५०, मूल्य ₹ १२०, पृष्ठे – १२०



## संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

**'सर्वप्रथम दिवाळी व नूतन संवत्सराच्या तुम्हाला हार्दिक शुभेच्छा!'**

दर्जेदार व वैविध्यपूर्ण साहित्याने नटलेला छात्र प्रबोधनचा हा **बत्तीसावा दिवाळी अंक!** या अंकासोबतच **इंग्रजी दिवाळी अंक, ग्रामीण दोस्तांसाठी 'सुबोध' दिवाळी अंकही** प्रकाशित केले आहेत. तसेच कुमारांसाठी **२०२४ ची दिनदर्शिकाही** प्रकाशित झाली. अनेकांच्या अर्थसाहाय्यामुळे हे सर्व साहित्य अत्यंत सवलतीच्या दरात सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांना उपलब्ध झाले आहे, याचा विशेष आनंद वाटतो. या 'अक्षर-साहित्या'मुळे तुमची दिवाळी अधिक आनंददायी आणि समृद्ध होईल असा विश्वास वाटतो.

विविध रंगांच्या, गंधांच्या, लहान-मोठ्या आकारांच्या फुलांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेतून जसा फुलांचा आकर्षक गुच्छ तयार होतो; तसंच काहीसं या दिवाळी अंकाबाबत आहे, असं मला वाटतं. भावपूर्ण, आशयघन, प्रेरणादायी, कृतिपर, विचारांना चालना देणारं असं साहित्य तुम्हाला या दिवाळी अंकात वाचायला मिळणार आहे. वेगवेगळ्या शैलीतल्या या 'शब्द-फुलां'चा परिमल दीर्घकाळ तुमच्या मनात रेंगाळत, रुंजी घालत राहील. तुम्हाला अनेक नावीन्यपूर्ण अनुभव घ्यायला प्रेरित करेल, हे निश्चित.

कथा-कविता-ललित लेखांबरोबरच या अंकात माहितीपर, व्यक्तिविकसनपर लेख, विशेष लेख आहेत. 'चित्र समजून घेताना' हा विशेष लेख चित्र कसं पाहायचं, चित्रांचा आस्वाद कसा घ्यायचा? या बाबतची समज वाढवणारा आहे! तसेच कारगिलसारख्या दुर्गम भागातील सैनिकांपुढे कोणती आव्हाने आहेत, देशस्थितीचा अभ्यास का करायचा, अभ्यास दौरे करणं का महत्त्वाचं आहे? यांची उत्तरं तुम्हाला 'कारगिल विजयाच्या सुवर्णस्मृती' या विशेष लेखात मिळतील. प्रश्न का पडले पाहिजेत? शिक्षण कंटाळवाणे न होता, 'आनंददायी' होण्यासाठी काय करायचं, हे 'शिकण्याची 'हौस' कशी वाढवाल?' या लेखातून तुम्हाला उलगडेल.

**'मला जमू लागलं!'** या तीन शब्दांची 'जादू'च मोठी न्यारी आहे. मात्र, ही जादू अनुभवण्यासाठी इच्छाशक्ती आणि अथक प्रयत्नांची तयारी हवी. नवीन काही करून पाहाण्याचा आळस, मनातील संकोच, अपयशाची भीती, मित्रांची शेरेबाजी, 'आपलं हसं झालं तर...' ची धास्ती या सर्व नकारात्मक भावनांचे अडथळे पार करत, जे ठरवलेल्या ध्येयापर्यंत पोहोचतात; ते सर्व या प्रक्रियेचा आनंद घेत आत्मविश्वास आणि 'शहाणपण' कमावतात! असेच प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, अविरत प्रयत्न करत आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणारे 'बौद्धिक संपदा पुरस्कार' प्राप्त **मा. 'गणेश हिंगमिरे'** व युवा आंतरराष्ट्रीय क्रीडापटू **'पूर्वा बर्वे'** यांचे अनुभव 'अन् मला जमू लागलं' या शीर्षकाखाली दिले आहेत. ते वाचून नवीन काही करून बघण्याचे संकल्प तुम्ही कराल! 'हा दिवाळी अंक कसा वाटला' ते आम्हाला नक्की कळवा. दिवाळी अंकात जाहीर केलेल्या राज्यस्तरीय सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेत सहभागी व्हा! (पान क्र. ३१, १०५ वाचा).

मागील महिन्यात मी 'दिवाळीपूर्वीची-दिवाळी' लातूर येथे अनुभवली. निमित्त होतं 'छात्र प्रबोधन' व जनकल्याण निवासी विद्यालय लातूर यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कुमार साहित्य संमेलनाचं! लातूर परिसरातल्या २६ शाळांतील, सुमारे ५५० विद्यार्थी त्या संमेलनात सहभागी झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह ओसंडून वाहात होता. साहित्यिकांना भेटण्याचं कुतूहल त्यांच्या डोळ्यांत होतं. नवं काही शिकायची ऊर्मी त्यांच्या देहबोलीतून स्पष्ट दिसत होती. 'शारदे'च्या अंगणात जणू काही 'शब्दांची-दिवाळी' साजरी होत होती. मोठं विलक्षण दृश्य होतं ते! (पान क्र. ११३ वाचा). असे संमेलन तुमच्या भागात देखील योजायचे असेल तर 'छात्र प्रबोधन'शी संपर्क साधा.

**'हे नवीन संवत्सर तुमच्यातल्या अफाट, अमर्याद क्षमतांची जाणीव होण्यासाठी उपयोगी पडो,' या सदिच्छेसह पुन्हा एकदा दिवाळीच्या भरभरून शुभेच्छा!!**

**तुमची**
**शिल्पाताई**

या पी डी एफ मधील क्यू आर कोडला क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन
## दिवाळी विशेषांक २०२३
# अंतरंग

### कथा

**७. आमचापण 'साउंड ऑफ म्युझिक'** – सुहासिनी देशपांडे
१०.✼ वाचा कथा–अदम्य अमुची इच्छाशक्ती – विवेक पोंक्षे
**२३. खबरबात घेई कुणी** – क्षितिज देसाई
३०.✼ ऐका कथा – रिमिक्स आणि आजी – मंगला गोडबोले
**६३. बालवीर हुतात्मा नारायण दाभाडे** – मोहन शेटे
६६.✼ ऐका कथा – क्रियेविण वाचाळता... – गोविंद गोडबोले
**८३. दादा** – स्वाती राजे
८८.✼ ऐका कथा – गोष्टीची आजी – मल्हार अरणकल्ले


### विशेष लेख...

**३५. चित्र समजून घेताना*** – अदिती हर्डीकर
३७.✼ वाचा लेख – चित्रलीला – गोपाळ नांदुरकर
**५१. अन् मला जमू लागले!** – गणेश हिंगमिरे, – पूर्वा बर्वे
५४.✼ पाहा –GI चा सांस्कृतिक प्रवास
५५.✼ पाहा– पूर्वा बर्वे हिची मुलाखत
**७३. कारगिल विजयाच्या सुवर्णस्मृती** – शिवराज पिंपुडे
**९९. शिकण्याची 'हौस' वाढवू या!** – महेन्द्र सेठिया


### लेखमाला

**४७. घेऊ प्रेरणा निसर्गापासून – लेखांक ५**
**शिकूया वाळवीकडून** – डॉ. नंदा हरम
**१०१. गप्पा आपल्या देशाच्या – लेखांक ११**
**भारत का इंडिया?** – मानसी बोडस


### मुलांचे पान

**६९. ललित : खिडकी** – कु. जाई सप्तर्षी
**७०. कविता : निसर्ग** – कु. प्राची भोईर
✼ ऐका कविता – टपोर चंद्र – शंतनू चिंधडे


### कविता

**११. दूधगंगा वाहते आहे** – आश्लेषा महाजन
११.✼ ऐका–वरील कवितेचे रसग्रहण – आश्लेषा महाजन
**३३. नदी** – मृणालिनी कानिटकर– जोशी
✼ ऐका कविता – अनुकूल होते कसे काय? – दत्ता हलसगीकर
**३९. नवे आकाश! नवा सूर्य!** – प्रवीण दवणे
✼ पाहा – एकी हेच बळ
**९१. तोवर आपल्या अंगणात** – प्रदीप आवटे
✼ पाहा – प्रकाशाच्या पाऊलखुणा
**११४. आव्हानांच्या गगनामध्ये** – वाच. अनघा लवळेकर
✼ ऐका – पद्याची चाल


### ललित

**१३. बच्चे मन के सच्चे...** – भूषण हर्षे
१७.✼ पाहा – 'अन्नपूर्णा' मोहिमेची चढाई
**४३. पार्वताईचं अंगण** – ऐश्वर्य पाटेकर
४५.✼ ऐका कथा– एक आगळी वेगळी दिवाळी – मृणालिनी गडकरी
**९३. देणे त्यांना ठाऊक फक्त** – एकनाथ आव्हाड
९४.✼ वाचा लेख – चांदोबा चांदोब भागलास का? – डॉ. प्रकाश तुपे
**११२. पुस्तक परिचय – जंगलातील दिवस** – ईशानी फडके
✼ वाचा – 'वाचलेच पाहिजे' अशा २२५ पुस्तकांची सूची
**११३. कुमार साहित्य संमेलन –एक अनुभूती** – माधुरी अंतरकर–पूर्णपात्रे
✼ पाहा – लातूर संमेलनाची झलक

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया
मानद संपादक
शैलजा देशमुख
संपादक मंडळ
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
मल्हार अरणकल्ले
स्वाती ताडफळे

कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी
साहा. कार्य. संपादक
वैशाली दीक्षित
अक्षर जुळणी
माधवी दाते
सुप्रिया कुलकर्णी
जाहिरात मांडणी
अर्चना कुलकर्णी

मुखपृष्ठ : सचिन जोशी
मांडणी/सजावट
राहुल धामणे
चित्रकार
दीपक संकपाळ, कुडल हिरेमठ,
सचिन जोशी, चित्रांजली,
सायली कुलकर्णी
शीर्षक लेखन
बाबू उडूपी, कविता घुगरे

अर्थ संकलन
वेदा भागवत
श्रुती गोखले
अपर्णा घाटे
प्रचार व वितरण
शुभदा कुलकर्णी
अमृत भट
ज्योती पवार, कविता खळे
संकेत खंडाळे
गावोगावचे केंद्रप्रमुख
कार्यकर्ते व शिक्षक



अंकातील कल्पक भेट
'बहुउपयोगी संकल्प फलक'

## कृतिपर

१८. पिस्त्याच्या टरफलांची दिव्यांची माळ – डॉ. वीणा लिमये
✼ पाहा – प्लॅस्टिक बाटल्यांचा पुनर्वापर
५७. विज्ञान प्रयोग : उमलणारी फुले – प्रीतेश लोले
✼ पाहा – मीठाचे ७ सोपे विज्ञान प्रयोग
७१. मक्याच्या कणसाच्या आवरणाची फुले – अपर्णा म्हात्रे
१०९. व्हिनेगर आणि बेकिंग सोडा रॉकेट – डॉ. कांचनगंगा गंधे
✼ पाहा – तंत्रज्ञानाचा आविष्कार

## माहितीपर लेख

१९. सॅल्मनची सफर – पल्लवी शेवाळे
२१.✼ पाहा – सॅल्मनचा जीवनप्रवास
४६. पांडवबत्ती – डॉ. कांचनगंगा गंधे
✼ पाहा – ३ डी चित्रकलेतील गंमत
९५. भंकू आणि त्याचा चॅट जीपीटी – स्वानंद जोशी

## कल्पक स्पर्धा

३१. राज्यस्तरीय सांघिक अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धा*
१०५. 'सफर दिवाळी विशेषांकाची' वैयक्तिक स्पर्धा

**याशिवाय –** ३. संवाद १२. सोडवा शब्दकोडे!
७९. चित्रांमधील गंमत १०३. एकतेची विविध रूपे*
१०७. करूया शब्द-तोरण १११. हसऱ्या रेषा
➢ **ज्ञान प्रबोधिनीविषयी –** ६.उपासनाभिमुखता*
७७. आजची प्रबोधिनी ९८. ज्ञान प्रबोधिनी सर्वांची सर्वांसाठी
➢ **प्रकाशने सूची –** २२. कुमारांसाठी पुस्तक सूची*
५०. ललित लेखसंग्रह ६७. कथासंग्रह ८९. व्यक्तिविकसनपर व अभ्यासविषयक पुस्तके १०५. एकपानी व सहापानी पुस्तकसूची

## छात्र प्रबोधन मासिकाविषयी...

सौर कार्तिक । शके १९४५ ।। वर्ष २४ । अंक २
एकूणात ३७६ वा अंक, वर्ष ३२ अंक ४
छात्र प्रबोधन – ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक! विद्यार्थ्यांच्या विकासाची चळवळ!!
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर १ कार्तिक, शके १९४५, २३ ऑक्टोबर २०२३
**या अंकाची किंमत :** ₹ १२०/-
**वर्गणी : वार्षिक –** ₹ २५०/-, **द्वैवार्षिक –** ₹ ५००/-, **त्रैवार्षिक –** ₹ ७५०/-, **दशवार्षिक –** ₹ २२००/-
(घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा.)
**इ-अंक : वार्षिक वर्गणी –** ₹ १००
**वर्गणी भरण्यासाठी व प्रकाशने खरेदीसाठी**
**www.jpprakashane.org**
**संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ, पुणे ३०. ☎ ०२०-२४२०७१७४/१७५
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org**

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**
✼ हे लेख QR कोडला जोडले आहेत, ते स्मार्टफोनवर स्कॅन करा. त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR Code Scanner मोफत डाऊनलोड करा.

वाचा
छात्र प्रबोधन
दिवाळी अंक २०२२

# ज्ञान प्रबोधिनी

## ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यसंस्कृतीचा पाया असलेले विशेष प्रबोधिनीपणाचे पैलू



भविष्याभिमुखता, **उपासनाभिमुखता** समाजाभिमुखता, संघटनाभिमुखता, विज्ञानाभिमुखता

### ज्ञान प्रबोधिनीला अभिप्रेत उपासनेचा अर्थ

*स्वत:वरील व परमेश्वरी शक्तीवरील आपली श्रद्धा दृढ करण्यासाठी भक्तियुक्त श्रद्धापूर्ण मनाने परमेश्वराशी म्हणजेच स्वत:मधील आत्मतत्त्वाशी केलेला संवाद म्हणजे **उपासना!***

*आपले मन आत वळवून, मन स्वच्छ करून, मन मोठ्या विषयात गुंतवणे आणि स्वत:ची एकाग्रतेची, योग्य ते निवडण्याची व ठरवल्याप्रमाणे वागण्याची शक्ती वाढविणे यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे **उपासना!***

*उच्चतर ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी, स्वत:मध्ये व समाजामध्ये योग्य ते बदल घडवून आणण्यासाठी आपले संकल्प मनातल्या मनात उच्चारत ते पूर्ण व्हावेत यासाठी प्रार्थना करणे म्हणजे **उपासना!***

**नियमितपणे स्वत:च्या वागण्याचे व कामाचे स्वत:च परीक्षण करणे; स्वत:ला आत्मीयतेने व आर्तपणे सूचना देत आपल्या जगण्याची गुणवत्ता वाढवणे आणि आपण व्यापक समाजहिताच्या मोठ्या कामाचे, मोठ्या ध्येयाचे, मोठ्या शक्तीचे, परमेश्वराचे साधन आहोत असे समजून अविरत, प्रयत्नपूर्वक कार्यरत राहणे म्हणजे उपासनाभिमुखता**

उपासनेविषयक लेख

प्राचीन काळापासून चालत आलेल्या उपासनेचे आधुनिक सर्वसमावेशक रूप म्हणजे ज्ञान प्रबोधिनीप्रणीत दैनंदिन उपासना!
या उपासनेमध्ये शक्तिमंत्र, शुद्धिमंत्र, गायत्रीमंत्र या तीन मंत्रांचा व ध्यानाचा समावेश आहे.
१९५० पासून १९७३ पर्यंत ही उपासना क्रमश: विकसित होत गेलेली आहे.

ज्ञान प्रबोधिनी
सार्थ दैनंदिन उपासना

### नियमित उपासनेमुळे व्यक्तिमत्त्वामध्ये काय बदल घडू शकतात?

- नित्य उपासनेने चित्तशुद्धी व्हायला मदत होते, नवनवीन सुचत जाते.
- एखादी गोष्ट आपल्या हिताची आहे की नाही हे समजायला लागते व त्यानुसार वागण्याची इच्छाशक्तीही निर्माण होते. असे वागण्यासाठी स्वत:मध्ये बदल करण्याची लवचिकता वाढते.
- बलोपासना, कलोपासना, ज्ञानोपासना, कर्तव्य-उपासना, सेवा-उपासना या विविध प्रकारच्या उपासना नियमितपणे व समतोलपणे चालू राहाव्यात याचे स्मरण करून देण्यासाठी दैनंदिन उपासनेचा उपयोग होतो.
- चिकाटीने, धैर्याने, उत्साहाने काम करण्याची आणि त्वरित अचूक निर्णय करण्याची शक्ती वाढते.
- सर्व परिस्थितीमध्ये प्रसन्न राहण्याची व अडचणीच्या प्रसंगात स्थिरचित्ताने मार्ग काढण्याची क्षमता वाढते.
- सर्व सदस्यांच्या कामात एकवाक्यता यावी, छोटे-मोठे रुसवे, मान-अपमान बाजूला ठेवून मोठ्या कामासाठी संघटनवृत्तीने झोकून देऊन काम करण्याची भावना वाढीस लागावी यासाठी सामूहिक उपासनेचा उपयोग होतो.

### "उपासनाभिमुखता" वाढवण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीतील काही कृतिकार्यक्रम

- ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांवर रोज सकाळी नियमितपणे उपासना होते.
- वैयक्तिक उपासनेबरोबरच प्रबोधिनीत सामूहिक उपासनेचाही आग्रह धरला जातो. प्रबोधिनीच्या विविध विभागांमध्ये साप्ताहिक सामूहिक उपासना होते. विविध निवासी उपक्रमांमध्ये दिवसाची सुरुवात सामूहिक उपासनेने होते. उपासनेपूर्वी व्यापक विधायक विचारांवर, उच्चतर ध्येयांवर, आत्मशक्तीची जाणीव होण्यावर बोलणे होते/वाचन होते.
- विद्याव्रत, वीरव्रत, आचार्यव्रत या व्रतांचे पालन होत राहण्यासाठी दैनंदिन उपासनेचा आग्रह धरला जातो.
- समूहाने उपासनेद्वारा समाजहिताचा संकल्प करण्यासाठी एक प्रयोग म्हणून २०१६ साली खुल्या क्रीडांगणावर सुमारे २६०० जणांनी एकत्र सामूहिक उपासना केली होती.
- ज्ञान प्रबोधिनी प्रणीत दैनंदिन उपासना सर्व धर्मांतील, जाति-पंथांमधील स्त्री-पुरुषांनी करावी, असे आवाहन आहे.

*****

# 'खबरे'त घेई कुणी!

– क्षितिज देसाई

अतिरेकी नागोरी आणि त्याचे 'ऑपरेशन नागोरी' विषयीचे साथीदार पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळाले. संपूर्ण गुप्तता पाळूनही हे कसं घडलं? नक्कीच पोलिसांच्या टीममध्ये कोणीतरी 'खबरी' असावा याची प्रमुखांना खात्री पटली. कसून चौकशी सुरू झाली...

कोण होता तो खबरी? त्याचा शोध कुणी व कसा लावला, हे वाचू या सोबतच्या उत्कंठावर्धक कथेत!

गोवंडीच्या फूलमार्केट भागातल्या शेवटच्या गल्लीतील सकाळची वेळ. साडेसहा वाजत आले होते. 'ऑर्किड अपार्टमेंट' इमारतीच्या रस्त्यावर वर्दळ नव्हती; कारण ती फक्त इमारत होती. त्यात कोणी रहिवासी नव्हते. अर्धवट बांधलेल्या त्या इमारतीकडे कोणाचं लक्षही जात नसे.

शांत वातावरणात पोलीस *सायरन*चा आवाज घुमला. अत्यंत वेगात आलेल्या तीन पोलीस गाड्या त्या इमारतीखाली थांबल्या. त्यातून सशस्त्र पोलिसांची *टीम* खाली उतरली.

वेळ न दवडता ते पोलीस भराभर '*ऑर्किड अपार्टमेंट*' इमारतीच्या जिन्याच्या पायऱ्या चढू लागले. त्यांची नजर सावध होती. पहिल्या तुकडीतले पोलीस हातातल्या बंदुका समोर रोखून जात होते. शेवटच्या तुकडीच्या हातातल्या बंदुका आसपास चौफेर नजर ठेवत रोखल्या होत्या. पहिल्या मजल्यावर मोठ्या हॉलच्या बंद दरवाजासमोर पोलिसांची टीम पोहोचली.

या अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीत 'नागोरी' या अतिरेक्याचं सेफहाऊस असल्याची खबर पोलिसांकडे होती. नागोरीला आणि त्याच्या टोळीला पकडण्यासाठी ही 'एटीएस' अर्थात 'दहशतवाद विरोधी पथका'ची कारवाई सुरू होती. या मोहिमेचं नेतृत्व करत होती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजुक्ता.

अतिरेकी नागोरी त्या सेफहाऊसमध्ये असल्याची खबर मुंबई एटीएस कार्यालयाला काल रात्री मिळाली होती. एटीएसचा आणखी एक निरीक्षक आफताब काल साटमवाडी गावात मानवगड बंदर येथे गेला होता. त्या बंदरावरून नागोरीच्या दहशतवादी टोळीचा मुखिया असलेल्या 'कमांडर अफजल' या अतिरेक्याला ताब्यात घेण्याची मोहीम आफताबच्या टीमने पार पाडली होती. त्या मोहिमेत त्याला साहाय्य केलं एटीएसचा हवालदार मुजुमदार, साटमवाडीच्या टीममधल्या उपनिरीक्षक तुषार आणि हवालदार वागळे यांनी. मात्र या मोहिमेदरम्यान कमांडरला सोडवून नेण्याचा प्रयत्न करणारा टोळीतील एक छोटा साथीदार साटमवाडीत पकडला गेला. नागोरीच्या योजनेप्रमाणे तो साथीदार काम करत होता. त्या साथीदाराकडूनच पोलिसांनी शिताफीने नागोरीच्या मुंबईच्या सेफहाऊसचा पत्ता काढून घेतला. आज सकाळीच जिथे सेफहाऊस आहे, त्या इमारतीवर धाड टाकायचा पोलीस आदेश घेऊन निरीक्षक संजुक्ता तिच्या टीमसह आली होती.

संजुक्ताने हाती धरलेल्या *स्पीकरवर* घोषणा केली,

''नागोरी! आमच्या पोलीस *टीमने* तुमच्या *सेफहाऊसच्या* बाहेर वेढा दिलेला आहे. चुपचाप तुझ्या साथीदारांसह पोलिसांना शरण ये! नाहीतर आमच्यासमोर गोळीबार करण्यावाचून काही पर्याय उरणार नाही. आम्ही तुला शरण यायला दहा सेकंद देतोय. दहा.. नऊ.. आठ.. ''

आकडे 'दोन.. एक'पर्यंत पोहोचले. संजुक्ताने 'शून्य' म्हणताच इतर पोलिसांनी संपूर्ण ताकदीनिशी त्या दरवाजावर लाथा घातल्या. चार-पाच धडकेत तो दरवाजा उघडला गेला. पहिल्या तुकडीतल्या पोलिसांनी बंदुका समोर रोखलेल्याच होत्या.

मात्र त्यांच्या बंदुकांची गरजच पडली नाही. समोर कोणीही नव्हतं. संपूर्ण *हॉल* रिकामा होता. मात्र त्या *हॉलमध्ये* नुकताच कोणाचा तरी वावर होऊन गेला हे स्पष्ट होतं. *हॉलमधल्या* टेबलखुर्च्या तशाच होत्या. *वायरींचं* जंजाळ पसरलं होतं. *लॅपटॉप, अँटिना, प्रिंटर, रेडिओ* इत्यादी अनेक उपकरणं इतस्तत: पडली होती.

संजुक्ताने *वायरलेस फोन* बाहेर काढला.

''*हॅलो, बॉस*''

''बोला, संजुक्ता.''

''*बॉस, 'ऑपरेशन* नागोरी' अपयशी ठरलं आहे. आपली *टीम* पोहोचण्यापूर्वीच नागोरी आणि त्याचे साथीदार सगळं सामान तसंच टाकून पळालेले दिसत आहेत आणि इथलं सगळं वातावरण पाहून स्पष्ट आहे की, ते नुकतेच पळाले असावेत.''

''नुकतेच पळाले? म्हणजे संजुक्ता, याचा अर्थ कळतोय तुम्हाला?''

''हो, सर. आपल्या *टीममध्येच* कोणीतरी खबरी आहे!''

***

ऋजुता ही साटमवाडीत राहणारी *कॉलेजकन्यका.* पण आता ती आली होती मुंबईला. मुंबई पोलिसांच्या *'एटीएस'* मुख्यालयात ती एका दालनाबाहेर प्रतीक्षालयात बसली होती. तिने दालनावरची पाटी वाचली:

**हेमंत रॉय,**

***जॉईंट कमिशनर ऑफ पोलीस,***

***अँटी टेररिस्ट स्क्वॉड.***

थोड्या वेळाने आतून पोलीस शिपाई अनिल आला. त्याने सूचना दिली,

''ऋजुता वाडकर! तुम्हाला





जाणून घ्या - संशोधन संस्था : **राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था** (गोवा)-हिंदी महासागरातील समुद्रशास्त्रीय वैशिष्ट्यांवर संशोधन.



वार्षिक देणगीदार - • सौ. नंदिता गाडगीळ, पुणे • कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

रॉय सरांनी आत बोलवलं आहे.''

अनिलच्या मागोमाग दार ढकलून ऋजुता दालनात गेली.

रॉय सरांचं व्यक्तिमत्त्व पाहताक्षणी लक्ष वेधून घेणारं होतं. एखाद्या पहिलवानासारखी त्यांची शरीरयष्टी होती. चेहऱ्यावरच्या मिशा त्यांच्या करारीपणात भर घालत होत्या.

''*वेलकम* ऋजुता, *वेलकम*. कशी काय वाटली मुंबई?'' त्यांनी विचारलं.

''अं.. खूप गरम!''

''हा हा हा!'' रॉय सर दिलखुलास हसले.

''*टेन्शन* घेऊ नकोस, इथे *एसी* आहे.''

रॉय सरांच्या समोरच्या खुर्चीवर तुषार बसला होता. तुषार हा ऋजुताच्याच साटम वाडीतला पोलीस उपनिरीक्षक. तुषार सोबतच ऋजुता आज दुपारी मुंबईला आली होती.

''तुषारने मला तुझ्याबद्दल खूप काही सांगितलं आहे. तू आतापर्यंत त्याच्या *टीमला* कसं वेगवेगळ्या मोहिमांमध्ये वैज्ञानिक युक्त्यांच्या आधारे मदत केली आहेस ते! साटमवाडीत त्या अतिरेकी साथीदाराकडून *सेफहाऊसचा* पत्ता काढून घेण्याची कल्पना तुझीच होती.''

तुषार म्हणाला, ''सर, त्याला पकडण्यातही हिचा सिंहाचा वाटा होता.''

''मी फक्त थोडीशी मदत केली, सर!'' ऋजुता म्हणाली.

''हा तुझा नम्रपणा झाला. आमच्या *'एटीएस'तर्फे* तुझे खूप



यापुढील कथा मूळ अंकात वाचा...

# पार्वताईचं अंगण

– ऐश्वर्य पाटेकर

पार्वताईचं अंगण इतकं मोठ्ठं होतं की, कोणताही कार्यक्रम असो सारं गाव त्यात मावून जायचं, साऱ्या गावाला ते पुरून उरायचं. खरंच का ते इतकं मोठ्ठं होतं? 'पार्वताईच्या अंगणाची मजा समजायची, हे अंगण समजून घ्यायचं, तर काळीजही तितकंच तरल हवं!' खेड्यातील माणसांचं अंगणाशी असलेलं तरल नातं या लेखात अगदी साध्यासुध्या प्रसंगातून किती हळुवारपणे उलगडलं आहे हे अनुभवायला हवं...

ललित

पार्वताईच्या अंगणाइतकं सुंदर अंगण तुम्हाला गवसणारच नाही. पैजेचा विडा उचलून शोधायचं त्यांनी शोधावं. शोधून मला सांगितलं, तरी मी हेच म्हणणार की 'पार्वताईचंच अंगण सुंदर आहे.' त्याचं एकमेव कारण म्हणजे पार्वताईचं अंगण माझ्या काळजात घट्ट रुतून बसलं आहे. त्यामुळे तुलना करायच्या फंदात उगाच कुणी पडू नये. पार्वताईच्या अंगणाविषयीच्या सगळ्याच गोष्टी मला काही सांगता येणार नाहीत. काही गोष्टी शब्दांशिवायच्याच असतात. त्यांना शब्दात कसं बांधणार? जेवढं जेवढं शब्दांच्या मापट्याच्या आवाक्यातलं आहे; तेवढं तसूभरही इकडं तिकडं न करता मी तुम्हाला सांगणार आहे.

*सकाळी उठून झाडीते अंगण-वटा*
*माझ्या अंगणातून सूर्य-नारायणाच्या वाटा*
*सकाळी उठून अंगण झाडी घाई घाई*
*पारोसा आंगेवर देव पाय देत नाही!*



झुळझुळ गात गाणे, झरा वाहे संगीतात । पक्षी टिपतात दाणे, निसर्गाच्या अंगणात ।।

वार्षिक देणगीदार - * श्री. अनिरुद्ध शहापूरकर, पुणे * श्री. सागर सुभाष सुराणा, पुणे

हे पार्वताईचं तत्त्वज्ञान आहे अन् ते तिच्या नसानसात मुरून राहिलं होतं. घालायला चांगले कपडे नसतील, जेवायला भाकर नसेल, तरी तिला त्याची काही म्हणून फिकीर नव्हती. मात्र अंगण स्वच्छ हवं. तेही आरशासारखं; अन् घासलेल्या भांड्यासारखं लख्ख चकचकीत. तसंही जिच्या अंगणातून सूर्याच्या वाटा जात होत्या ते अंगण साधं कसं असेल? अंगणाची कोणी हेळसांड केलेली तिला बिलकूल खपत नसे. अंगणावर तिचा जीवच फार. बरं तिची खोडी काढायची म्हणून जर का तुम्ही सांगितलं असतं की, 'पार्वताई तुझ्या अंगणापेक्षा अमकीचं अंगण लई भारीये!' तर तिला जरासाही मत्सर वाटला नसता. उलट आनंदच झाला असता! तिला तिचंच नाही, तर अख्ख्या जगाचं अंगण टापटीप असलेलं हवं असं वाटायचं. एखाद्याच्या अंगणाची झाडलोट झाली नसेल, तर पार्वताईचा ओरडा खावा लागायचा. तरी त्या घरातली आयबाई ब्र उच्चारायची नाही;



उलट खजील व्हायची. तिनं स्वच्छ आणि सुंदर अंगणाचा वस्तुपाठ समोर ठेवल्यामुळे तिला हे *परमिटच* मिळालं होतं.

शहरातली माणसं घरात राहतात, तर खेड्यातील माणसं अंगणात! त्यांचा अर्धा संसार अंगणात पसरलेला असतो. म्हणूनच ती मुंबईला, 'बिनअंगणाचं शहर' म्हणायची. तिच्या मुंबईच्या लेकीच्या घरून आल्यावर तिनं मांडलेलं हे सत्य!

तर मी सांगत होतो पार्वताईच्या अंगणाबद्दल! म्हणजे गावात दुसरं अंगण नव्हतं असं नाही. मात्र बांगड्या भरणारा कासार आला तरी त्याला पार्वताईच्या अंगणात थांबायला सांगितलं जाई. मग सगळ्या आया-बाया जमून बांगड्या भरायचा कार्यक्रम सुरू व्हायचा. कासारालाही पार्वताईचं अंगण ठाऊक होतंच. त्याला जर पर्यायी अंगण दिलं असतं, तर त्याला बायांच्या हातात बांगड्याच भरता आल्या नसत्या; इतका तिच्या अंगणाचा गुण होता. जुन्या भांड्यांना कल्हई करून देणारा मुकाबाबा आला, तरी तो गावात फिरून पार्वताईच्या अंगणातच पथारी मांडायचा. पुंडलिक पहिलवानाचा खेळही पार्वताईच्याच अंगणात. एवढंच कशाला, माकडवाल्याचा अन् डोबाऱ्याचा खेळही पार्वताईच्याच अंगणात.

**यापुढील ललित लेख मूळ अंकात वाचा...**

# नवे आकाश! नवा सूर्य!

आभाळाच्या दौतीत जेव्हा मी बुडवतो कल्पनेचा कुंचला,
तेव्हा कागद होत जातो आपोआप निळा,
कुणास ठाऊक कसा, पण त्यातून उगवतो, अनोखवी सोनेरी सूर्य,
नि पसरतात सोनेरी किरणे, चमकतात दवबिंदूतील ज्योती,
गंमत म्हणजे,चक्क झुलू लागतात, निळूल्या पाकोळ्या, अगदी माझ्या अवतीभवती!


मग पुन्हा मी पाहतो कागदावरील कोऱ्या जागेकडे,
तर कुणास ठाऊक येतो कुठून, लोकरी टिंबांचा गुबगुबीत कळप,
त्या बें-बें सुरावटीत मी हरवतो, नादावतो, ज्या गाण्याचे शब्दही नसतात कळत,
आता त्यांच्यासाठीच आल्यासारखी उमटते कागदावर एक झुळझुळणारी नदी,
त्यात डुलणाऱ्या होडुलीसह!
त्यातून येणार असतात अगदी नवे चेहरे, जे बहुदा होणार असतात माझे मित्र,
मला आवडू लागलेले असते, माझे हे नवे चित्र!
बदलून जाते तीच शाळा, तेच पुस्तक, तेच घर!

दिसणाऱ्या जगापलीकडील वेगळे जग, निळे अंबर,
हे सारे समोर आणणारा हा कल्पनेचा कुंचला जपून ठेवणार आहे मी,
माझ्या मनाच्या रंगपेटीत!

आता दुसरा कोरा कागद साद घालीत आहे,
त्यासाठी थांबलो आहे, स्वतःच्या आत नवे चित्र शोधीत;
कुंचला बुडवून आभाळाच्या दौतीत!

- प्रवीण दवणे
ब ३०३ राजहंस, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम) 400604

चित्रकार : सचिन जोशी



जरूर पाहा - प्रेरणादायी चित्रफीत
'एकी हेच बळ!'

चॅट जीपीटी म्हणजे काय? – २०१७ साली 'गूगल'मधील शास्त्रज्ञांनी 'ट्रान्सफॉर्मर' या नवीन AI (आर्टिफिशल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा शोध लावला. याच तंत्रावर अधिक संशोधनांती जीपीटी ३.५ (जनरेटिव्ह प्री-ट्रेन्ड ट्रान्सफॉर्मर) अधिक परिणामकारी प्रणाली 'ओपन एआय' कंपनीने २०२२ मध्ये जगासमोर आणली. इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या सगळ्या भाषिक डेटाला 'पचवून' त्यातून एक विलक्षण कृत्रिम बुद्धिमत्ता चॅट जीपीटीच्या रूपाने निर्माण झाली आहे. चॅट जीपीटी आज वैद्यकीय, कायदा, संगणकासारख्या अनेक विषयातील पदव्युत्तर परीक्षा सहजपणे उत्तीर्ण होऊ शकतो. मनात आलेला जगातला कुठलाही प्रश्न चॅट जीपीटीला विचारायचा अवकाश; अतिशय मुद्देसूद आणि आखीव-रेखीव असं उत्तर चॅट जीपीटी आपल्या डोळ्यांसमोर लिहून देतो. https://chat.openai.com/ संकेतस्थळावर हे प्रात्यक्षिक आपण मोफत पाहू शकता.




# भंकू आणि त्याचा चॅट जीपीटी



– स्वानंद जोशी

''भंकू! किती भाव खातोयस? तुला ३० पैकी ३० कसे काय मिळाले निबंधाच्या गृहपाठात? इरालापण पंचवीसच आहेत. कसं शक्य आहे हे? चीटिंग केलीस ना? सांग!!'' सगळा सातवीचा वर्ग वेगवेगळ्या पद्धतींनी पंकज उर्फ पंकू उर्फ भंकस उर्फ भंकूला विनवण्या करत होता. वर्गात सगळ्या विषयात पहिली येणारी इरा रुसून बसली होती. 'भंकू आज इंग्रजीच्या गृहपाठात पहिला!' कुणाचाच यावर विश्वास बसेना. इतका सुंदर आणि मुद्देसूद निबंध लिहिल्याबद्दल स्मिता टीचरनेसुद्धा आज भंकूचं खूप कौतुक केलं होतं. थोडक्यात काय, भंकू आज ४ फूट हवेतून चालत होता.

पुढचा तास इतिहास आणि समाजशास्त्राचा होता! मधुराताई वर्गात शिरताच मुलांचं काहीतरी बिनसलंय हे तिच्या लक्षात आलं.

''इरा! काल कुठपर्यंत आलो होतो आपण?'' मधुराताई इतिहासाचं पुस्तक उघडत म्हणाली.

इराच्या डोळ्यांच्या काठावर बराच वेळ अडकलेला मोठा टपोरा मिस्टर रडू धपकन खाली कोसळला.

''ताई.. ताई भंकू.. भंकू खोटं बोलतोय!'' इराच्या शब्दांची गाडी पार रडण्याच्या नादात कोसळून गेली.

''ताई मी काहीच चीटिंग केली नाहीए. इंग्रजीचा गृहपाठ करताना इंटरनेट वापरलेलं चालणार होतं. सीमा टीचरने तसं सांगितलंच होतं. सगळेच वापरतात. ही इरुडी उगीच मूड ऑफ करून बसलीये. आणि दरवेळेला तीच पहिली येणारे का?'' भंकूचं तप्त विधान.

शेवटी सुमननेच शांतपणे उरलेला वृत्तांत ताई समोर मांडला.

''अच्छा.. असं झालंय तर!'' भंकू आणि इरा दोघंही जरा ओशाळले.

''ताई पण इंटरनेट वापरणं चुकीचं आहेना. मग आपल्या बुद्धीचा काय उपयोग?'' इरा म्हणाली.

''ताई, मी चीटिंग नाही केली, फक्त चॅट

*जीपीटीला* निबंध लिहायला सांगितला, त्याने लिहून दिला! मी २/३ वेगवेगळे निबंध लिहून घेतले आणि मला आवडलेला *सिलेक्ट* केला. यात माझं काय चुकलं? *चॅट जीपीटी* तर नवा *गूगल* आहे, त्याने सांगितलेलं कसं चुकीचं असेल,'' इति भंकू.

''*चॅट जीपीटी!*'' हा प्रकार सगळ्यांना नवीनच होता. भंकूचे बाबा स्वतः *सॉफ्टवेअरमध्ये* असल्यामुळे त्याला या आविष्काराबद्दल माहिती असावी, हे ताईनं ओळखलं.

मधुराताईने वर्गातला संगणक सुरू केला. संगणक शिक्षिका हुमादीदीला वर्गात बोलावून घेतलं. दोन्ही शिक्षिकांमध्ये थोडी चर्चा झाली. हुमादीदीने *कीबोर्ड* हातात घेतला.

https://chat.openai.com/ हे संकेतस्थळ उघडण्यात आलं. पडद्यावर मोकळा *कॅनव्हास* दिसू लागला. त्यावर *गूगलमध्ये* दिसतो, तसा एक *सर्च बार* होता.

'तुमचा प्रश्न काय?' असा मजकूर होता. सर्वजण टक लावून बघू लागले.

हुमादीदीने भंकूला विचारलं, ''पंकज, काय होता इंग्रजीच्या गृहपाठाचा विषय?''

"what humanity means to you?" 'मानवता म्हणजे काय' - असं कुणीतरी दबक्या आवाजात म्हटलं.

हुमादीदीने झराझर तो *'प्रॉम्प्ट'* लिहिला एंटर दाबायचाच अवकाश, *'चॅट जीपीटी'* एका जादुई *जीनीप्रमाणे* धडाधड निबंध लिहू लागला. अतिशय एकसंध आणि सकस असा लेख ३ सेकंदात तयार! अख्खा वर्ग चकित झाला!

हुमादीदीने पुढच्याच क्षणी ''मला हा निबंध आवडला नाही. नवीन लिहून दे,'' असा *'प्रॉम्प्ट'* देताच अतिशय आज्ञाधारकपणे *'चॅट जीपीटी'ने* एक नवा कोरा निबंध छापला आणि शेवटी 'हा निबंध आवडतोय का?' हेही विचारलं.

मग हुमादीदीने गणितातले अवघड प्रश्न विचारले. *'चॅट जीपीटी'* ने अगदी अचूक उत्तरं दिली. योग्य ठिकाणी आकृत्यापण काढून दिल्या. पुढे विज्ञानातले सिद्धांत, त्याचे *फॉर्म्युले* असं सगळं अगदी १००% बरोबर सांगितलं.

आता मात्र सगळ्यांचे डोळे चक्रावले. 'पुढचे सगळे गृहपाठ, सगळ्या चाचण्या, सगळा अभ्यास *'चॅट जीपीटी'च्याच* हवाली करायचा' अशी कुजबुज सुरू झाली. इराची धडधड तर खोलीभर ऐकू येत होती.

''*चॅट जीपीटी'* ही एक कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारलेली यंत्रणा आहे. संगणक शास्त्रज्ञांनी गेली १०-१२ वर्षं या क्षेत्रांत सातत्याने केलेल्या संशोधनाचे ते फलित आहे,'' हुमादीदी समजावून सांगू लागली.

''यामध्ये कुठलीही सूचना आणि नियम न लिहिता जगभरातला सगळा *डेटा*, सगळी माहिती *चॅट जीपीटीला* केवळ 'दाखवली' गेली. त्या सगळ्या माहितीचं आकलन *चॅट-जीपीटीने* स्वतः च्या १७५ अब्ज *न्यूरॉन्स* म्हणजेच चेतापेशींमध्ये सामावून ठेवलंय. म्हणजे बघा, आपल्या मनुष्याच्या मेंदूमध्ये असतात सुमारे ९० अब्ज चेतापेशी. आणि *चॅटजीपीटीच्या* १७५ अब्ज! म्हणजे कोण जास्त हुशार झालं?''

''*चॅट जीपीटी!*'' एक सुरात आवाज आला.

''बघू या हं आता पुढचे प्रश्न,'' मधुराताईनं विचारलेल्या प्रश्नांची *चॅट जीपीटीने* अशी काहीशी उत्तरं दिली -

**यापुढील माहितीपर लेख मूळ अंकात वाचा...**



# ...अन् मला जमू लागले !

एखादी गोष्ट मला जमतच नाही, जमणारच नाही.... इथपासून असाध्य वाटणारी गोष्ट मला जमायलाच हवी, नक्की जमणारच; ते अखेर जमलं!! हा प्रवास नकळत्या बालवयापासून ते प्रौढ वयापर्यंत चालूच असतो.

मला गणित जमत नाही, व्यासपीठावर बोलता येत नाही, चार मित्रांच्यात जमवून घेता येत नाही, मैदानावर खेळ जमत नाही..., संभाषण जमत नाही, इंग्रजी बोलता येत नाही... अशी एक ना अनेक गोष्टींची भली-मोठी यादी आपल्या व्यक्तिमत्त्व विकासात आड येते; पण प्रयत्नाने त्यावर मात करता येते. प्रामाणिक कष्ट, आपली समस्या नीट समजून घेणं, त्यातील भावनिक अडथळ्यांवर मात करणं; याच्या जोरावर अखेर जेव्हा न जमणाऱ्या गोष्टी जमू लागतात; तेव्हा होणारा आनंद अवर्णनीय असतो.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, अथक परिश्रमाने सामान्य कुटुंबात वाढलेला एक मुलगा जागतिक कीर्तीचे काम करतो. हा अनुभव 'गणेश हिंगमिरे' यांच्या कथनात अनुभवायला मिळेल, तर युवा गटातील प्रथितयश, आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू 'पूर्वा बर्वे!' काही काळ आत्मविश्वास गमावल्यामुळे अपयश, निराशेच्या दरीत ती गेली होती; पण त्यातून प्रयत्नपूर्वक बाहेर पडून तिचा अव्वल खेळ ती परत करू शकली! ही आहेत दोन प्रातिनिधिक उदाहरणं!

एकूण काय, 'मला नक्की जमेल' हा आत्मविश्वास असेल, कष्ट करण्याची तयारी, सातत्य, जिद्द असेल तर आपल्याला न जमणारी गोष्ट जमू लागतेच !

## असाध्य ते साध्य...!

**श्री. गणेश हिंगमिरे**

- शिक्षण : बी. एससी. - रसायन शास्त्र,
  कायद्यातील पदव्युत्तर शिक्षण (कार्डिफ विद्यापीठ, यु.के.)
  एम.फिल - अर्थशास्त्र
- कार्यक्षेत्र : नोंदणी, खटला चालवणे, शोध आणि संशोधन यांसह बौद्धिक संपदा अधिकारांशी निगडित कार्यक्षेत्र
- पुरस्कार : २०१५ व २०१६ मध्ये सलग दोन राष्ट्रीय बौद्धिक संपदा पुरस्कार विजेते



आलेलं अपयश हे आव्हान असतं । त्याला न स्वीकारता जगणं, हे जगणंच नसतं ।।



वार्षिक देणगीदार - • श्री. पूनमचंद सिंघवी, लवळा, पुणे • श्री. अजय फाटक, पुणे

'**बा**लमनावर झालेले संस्कार आयुष्यभर पुरतात' तसेच 'जगात कुठलीच गोष्ट अशक्य नसते,' या वाक्यांचे माझ्यावर बालपणी झालेले संस्कार माझ्या कायम लक्षात राहिले आहेत.

माझे काका कै. गुलाबराव हिंगमिरे यांनी माझ्या वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेतली; परंतु दुर्दैवाने त्यांनाही मोठ्या अपघाताला सामोरं जावं लागलं. आणि आमच्या कुटुंबावर आभाळच कोसळलं. अपघातात काकांचा उजवा पाय पूर्ण निकामी झाला असल्याकारणाने 'भाड्याच्या घराच्याजवळ काही व्यवसाय करता येईल का,' याचा विचार करून, त्यांनी पानाचं दुकान सुरू केलं. त्या पानाच्या दुकानात मी वयाच्या सहाव्या वर्षापासून कामासाठी दाखल झालो.

परंतु काकांनीच शिक्षणाची गोडी मनावर बिंबवल्यामुळे माझं शिक्षण सुरू झालं. हे शिक्षण सुरू असताना त्यात अनेक अडचणी होत्या. आर्थिक अडचण तरी मोठी होतीच; पण उच्चशिक्षण घेण्यासाठी सर्वात मोठी अडचण होती, ती म्हणजे इंग्रजी भाषेची. मी ज्या शाळेत दाखल झालो होतो, ती शाळा सातवीपर्यंतच होती. 'केवळ लिहिता-वाचता यावे' या उद्दिष्टाने सुरू केलेल्या 'नूतन समर्थ विद्यालय' या शाळेमध्ये जवळपास ७० % मुलं ही लालबत्ती भागात *(रेड लाईट एरिया)* काम करणाऱ्या महिलांची मुलं असायची. आणि त्यांना किमान 'अक्षर ओळख' व्हावी हा या शाळेचा हेतू असायचा. परिस्थितीमुळे मला त्या शाळेत महिना दोन रुपये फी वर दाखला मिळाला होता.

माझ्या काकांनी मला मोठी स्वप्नं बघायला शिकवलं. काका नेहमी महात्मा गांधी, स्वा. सावरकर यांची उदाहरणं देऊन, त्यांच्यासारखं उच्चशिक्षण घेण्यासाठी व देशकार्य करण्यासाठी प्रवृत्त करत असत. उच्च शिक्षणासाठी परदेशात जायचं, तर त्यासाठी सर्वात मोठा अडथळा होता, तो इंग्रजीचा! इंग्रजीवर मात करायची म्हटल्यावर, त्या विषयाला आत्मसात करणं आवश्यक होतं. ती गोष्ट माझ्यासाठी अतिशय अवघड होती; कारण सातवीपर्यंत मला इंग्लिशमधला 'E' सुद्धा नीट माहीत नव्हता; परंतु ती भाषा शिकायचीच असं मी ठरवलं. मराठी माध्यमामधून इंग्रजी शिकत होतो; त्यामुळे इंग्रजीची तोंडओळख होत होती. नंतर अकरावी - *सायन्सला* प्रवेश घ्यायचं निश्चित केलं; पण अकरावी - *सायन्स* हे पूर्ण इंग्रजीमध्ये असणार होतं. पण मग निश्चय केला आणि त्या दृष्टिकोनातून पावलं उचलायला सुरुवात केली. सुदैवाने चांगले मित्र मिळाले. संध्याकाळी सात ते नऊ अभ्यासिकेत आणि रात्री बारा नंतर पहाटे चारपर्यंत जास्तीचा अभ्यास करायचो. विशेष करून रात्री बारानंतर विजयानंद चित्रपट गृहाबाहेर, शेजारी डोंगरे आळीमध्ये येरझारा मारत इंग्रजीची घोकंपट्टी करायचो. शब्द आत्मसात करून अगदी छोट्या-छोट्या शब्दांचे मिळून एक वाक्य बनवायचो. यासाठी स्वतः पासूनच सुरुवात करायचो. उदा. I am Ganesh. अशा वेळेला त्या डोंगरे आळीतल्या, काही मंडळींनी 'मी ठार वेडा होणार आहे' असं शिक्कामोर्तब केलं होतं; पण वेडी माणसंच इतिहास घडवतात. मला त्या इंग्रजीच्या वेडाने आनंद दिलाच आणि चालता-बोलता ती इंग्रजी भाषा नंतर माझी कधी झाली, हे मला कळलंच नाही.

**यापुढील विशेष लेख मूळ अंकात वाचा...**

**जरूर पाहा : चांग लो** (नागालँड) - हे नृत्य शत्रूंवर विजय साजरा करण्यासाठी केले जाते.

# पिस्त्याच्या टरफलांची दिव्यांची माळ

पिस्त्याची टरफले चांगली टणक, टिकाऊ आणि सुंदर आकाराची असतात. हीच टरफले वापरून आपण सुंदर अशी दिव्याची माळ बनवणार आहोत.

खाच



खाच









**साहित्य :** पिस्त्याची टरफले, छोट्या एल.इ.डीच्या पिवळ्या दिव्यांची विजेची माळ, कोणताही चांगला डिंक, फोम, कात्री, कटर इ.

**कृती :** पिस्त्याची टरफलं स्वच्छ करून घ्या. फोमचे अडीच सेमी. व्यासाचे आणि १ सेमी जाडीचे गोल कापून घ्या (चित्र क्र. १,२). चित्र क्र. १ व २ मध्ये दाखवल्याप्रमाणे संपूर्ण परिघावरील खुणेवर कटरच्या साहाय्याने खाच पाडून घ्या. वरती गोलावरही असलेल्या खुणेवर छोटी खाच पाडून घ्या. गोलाच्या मध्यभागी कात्रीच्या टोकाकडील भागाने एक छिद्र पाडून घ्या (चित्र क्र. १). हे छिद्रं डोळ्यांना कदाचित दिसणार नाही.

आता परिघावरील खाचेत चांगल्या डिंकाच्या साहाय्याने पिस्त्याच्या सालाची अरूंद बाजू खाचेच्या आत चांगली चिकटवा (चित्र क्र. ३). हे वाळल्यावर वरच्या खाचेतही सालं चिकटवा. नंतर फोमवरील छिद्राच्या भोवती पिस्त्याची सालं कळीसारखी चिकटवून घ्या (चित्र क्र. ३). आता अशी बरीच फुलं तयार करा.

आता दिव्याची माळ घ्या. फोममधील छिद्रातून खालून माळेतील दिवे फुलांत खोचून घ्या (चित्र क्र. ४).

आपली माळ तयार झाली! पाकळ्यांतून येणारा उजेड आणि सावलीची नक्षी अत्यंत सुंदर दिसेल (चित्र क्र. ५).

पिस्त्याच्या सालांचं तुम्ही आणखी काय बनवाल? पिस्त्याच्या सालांऐवजी अजून काय काय वापरू शकाल? ते वापरून तयार केलेली कलाकृती छात्र प्रबोधनकडे नक्की पाठवा.


- डॉ. वीणा लिमये
१७, सीमानगर सोसायटी,
आप्पर इंदिरानगर, पुणे - ४६

जरूर पाहा - चित्रफीत
प्लॅस्टिकच्या बाटल्यांचा कल्पक पुनर्वापर

जरूर ऐका - लोकसंगीत : कोळीगीत (महाराष्ट्र, गोवा) - या संगीत प्रकाराला ३०० वर्षे जुनी परंपरा आहे.

# शिकण्याची ‘हौस’ वाढवू या!

- महेन्द्र सेठिया



तुम्हाला लहानपणी बोलता यायला लागल्यापासून साधारण ९-१० वर्षांपर्यंत अनेक प्रश्न पडले असतील. आई-बाबा-भावंडं-नातेवाईक-मित्रमैत्रिणी, शिक्षक क्वचित प्रसंगी अपरिचित व्यक्तींना सुद्धा प्रश्न विचारून तुम्ही भंडावून सोडलं असेल. काहींची उत्तरं तुम्हाला मिळाली असतील, काहींची मिळाली नसतील. काहींबाबत ‘पुरे झाले तुझे प्रश्न पुराण,’ ‘असले मुर्खासारखे प्रश्न विचारू नकोस’, अशाही टिप्पणी ऐकायला मिळाल्या असतील. जसजसे तुम्ही मोठे होत जाता, तसतसे प्रश्न विचारण्याची तुमची सवय कमी-कमी होत जाते. खरं आहे का हे? का बरं ‘असं’ घडतं? चुकीचा प्रश्न विचारला तर कोणीतरी हसतील, आपल्याला नावं ठेवतील, अशी भीती मनात असते का? नेमक्या भाषेत प्रश्न मांडता येत नाही, असं घडतं का? नवनवीन ज्ञान मिळवण्यासाठी नवीन गोष्टी शिकण्यासाठी तुम्हाला प्रश्न पडायलाच हवेत. त्यातून कुतूहल-जिज्ञासा निर्माण व्हायला हवी. यासाठी वाढीच्या टप्प्यात खंडित झालेल्या तुमच्या प्रश्नांना पुन्हा एकदा धुमारे फुटू द्या. त्यासाठी २ खेळ सुचवतो, त्यापासून सुरुवात करा.

पहिला खेळ आहे **यक्ष प्रश्न!** दोघांनी किंवा अधिक जणांनी हा खेळ खेळावा. त्यापैकी एकीने/एकाने मनात एक वस्तू धरायची आणि इतरांनी प्रश्न विचारून ती वस्तू ओळखून दाखवायची. प्रश्न असे विचारायचे की, त्यांची उत्तरे ‘हो’ किंवा ‘नाही’ अशीच असतील. प्रश्न विचारणाऱ्यांनी थेट वस्तूंची नावं न घेता, त्याच्या ‘गुणधर्मां’च्या आधारे ती वस्तू ओळखायचा प्रयत्न करायचा. वेळोवेळी मिळालेल्या उत्तरांमधून वस्तूच्या अधिक जवळजवळ जाणारे प्रश्न विचारत जायचे. प्रारंभी खोलीतील वस्तूपासून सुरुवात करत, मग घरातली/शाळेतली/गावातली/जगातील आणि निर्जीव वस्तूंपासून मग सजीव, माणसे इ. पर्यंत तुमची मनातली गोष्ट वस्तू बदलत जाऊ शकाल. शक्यतो २० किंवा त्याहून कमी प्रश्नांमध्ये उत्तर शोधण्याचा प्रयत्न करायचा. हा खेळ तुम्ही कोणाबरोबरही, कुठंही, केव्हाही (प्रवासात, मोकळ्या वेळात, मोकळ्या *(ऑफ)* तासांना) खेळू शकाल. त्याबद्दल प्रश्न पडण्याला, अधिक अचूक व नेमके प्रश्न विचारायला पुन्हा सुरुवात होईल.

दुसरा खेळ आहे **प्रश्न वादळाचा!** हा एकट्यानेही खेळता येईल; पण गटाने मिळून खेळलात तर अधिक मजा येईल. सर्वांनी मिळून कोणतीही एक वस्तू किंवा वास्तू, सजीव किंवा व्यक्ती ठरवायची. ती सर्वांना सांगायची आणि आता त्याला उद्देशून जास्तीत जास्त प्रश्न सर्वांनी मिळून विचारायचे. मात्र हा खेळ खेळताना दोन अटी लक्षात ठेवायच्या. पहिली अट म्हणजे ‘प्रश्न चूक का बरोबर,’ योग्य ‘की अयोग्य’ असा विचार प्रश्न विचारणाऱ्यानेही करायचा नाही. आणि गटातील इतर सदस्यांनीही त्याबाबत आपली कोणतीही प्रतिक्रिया द्यायची नाही.

दुसरी अट म्हणजे **– उद्दिष्ट ठरवून गटाने मिळून १५-२० मिनिटांत किमान ५० प्रश्न तरी काढायचेच!** जमलं तर फळ्यावर, कागदावर कोणीतरी हे प्रश्न लिहावेत. प्रारंभी क्रमाने प्रत्येकाने एकतरी प्रश्न विचारायचाच. २-३ फेऱ्यांनंतर सुचेल त्याप्रमाणे कोणीही प्रश्न विचारायला हरकत नाही. शक्यतो तेचतेच प्रश्न विचारायचे टाळावे; पण कोणी तोच

प्रश्न पुन्हा सांगितला तर त्याकडे दुर्लक्ष करायचे. उदा. 'घड्याळ' ही वस्तू निवडली तर – कोणाचं आहे? कुठून घेतलं? काय किंमतीला? कशाने बनले आहे? कुठून ऊर्जा मिळते? *सेल* किती दिवस टिकतो? घड्याळ बंद पडलं होतं का? कशामुळे? घड्याळ *'वॉटरप्रुफ'* आहे का? पडलं तर फुटतं का? किती काटे आहेत? हात नसलेल्या माणसांसाठी गळ्यात घालायचं घड्याळ असतं का? अंधांसाठी कसे घड्याळ असू शकेल? घड्याळात वेगवेगळ्या देशांच्या वेळा एकाच वेळी कळू शकतील का? घड्याळ्याचा शोधच लागला नसता तर? दशमान पद्धतीचा वापर करून घड्याळ करता येईल का? असे इ. ७ वीतल्या वर्गाने २५ मिनिटांत सुमारे १२५ प्रश्न विचारले. तुम्हीही सुरुवात करा पाहू!

या खेळांच्या साहाय्याने तुम्हाला पुन्हा प्रश्न पडू लागतील, सुचायला लागतील त्याचा उपयोग अभ्यासासाठीही तुम्ही करू शकाल. त्यासाठी कोणत्याही विषयाचा धडा, प्रकरण वर्गात शिकवण्यापूर्वी, तो तुम्ही मनातल्या मनात वाचायचा. वाचता–वाचता त्यातल्या न कळलेल्या शब्दांखाली, वाक्यांखाली, संकल्पनांच्या ठिकाणी पेन्सिलने खुणा करा. धडा/प्रकरण वाचून झाल्यावर धड्याबाबत अजून काही वेगळे प्रश्न मनात येतात का? तेही नोंदवून ठेवा.

उदा. 'पाण्याची विविध रूपे.' हा धडा शिकताना बर्फ लवकर वितळू नये यासाठी कोणकोणते उपाय करता येतील? वाफ कोंडून ठेवली तर काय होईल? बर्फातून वाफा का बरं येतात? इ. ज्याची उत्तरे प्रामाणिकपणे मिळावीत असं तुम्हाला मनापासून वाटतं, असे जास्तीत जास्त प्रश्नं नोंदवायचा प्रयत्न करा आणि मग वर्गात जाऊन, तो धडा शिकताना आपल्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्याचा प्रयत्न करा. उत्तरं मिळाली नाहीत किंवा तुमच्या एखाद्या प्रश्नाला कोणी हसलं तर बिचकून जाऊ नका. जिज्ञासा, कुतूहल व त्यातून पडलेले प्रश्न घेऊन तुम्ही वर्गात बसलात, तर अधिक लक्षपूर्वक तुम्ही वर्गात ऐकाल आणि अनेक गोष्टी तुम्हाला समजायला मदत होईल.

यातल्या ज्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळणार नाहीत ती अन्य पुस्तकांमधून, *इंटरनेटद्वारे*, अनुभवी–तज्ज्ञ माणसांना विचारून, स्वत: प्रयोग करून, निरीक्षणे करून मिळवण्याचा प्रयत्न करा. आठवड्यातून एका तरी प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा पाठपुरावा अवश्य करावा. जसे धड्याबाबतचे प्रश्न आहेत, तसे आपल्या आसपासच्या गोष्टींबाबतचेही प्रश्न तुम्हाला हळूहळू पडायला हवेत. घरातल्या, शाळेतल्या, गावातल्या खटकणाऱ्या गोष्टींबाबतचे प्रश्न असतील किंवा त्यांच्या कारणांबाबत, परिणामांबाबतचे प्रश्न असतील! असे पडलेले प्रश्न एका वहीत नोंदवून ठेवा आणि मग सुट्टीत यातल्या एखाद्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी विशेष प्रयत्न करा.

प्रश्न पडणं, पडलेल्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी (मग ते परीक्षेला येणार आहे की, नाही असा विचार न करता) धडपडणं, त्यासाठी **निरीक्षण, प्रयोग, वाचन, गप्पा इ. मधून नवीन गोष्टी समजून घेणं, ज्ञान मिळवणं ही प्रक्रिया अखंडपणे सुरू राहिली पाहिजे. यालाच 'शिकण्याची हौस' लागली असं म्हणायचं**. ही शिकण्याची हौस वाढवण्याची अजूनही अनेक तंत्रे, पद्धती आहेत; पण या लेखात सुचवलेल्या गोष्टींपासून/तंत्रांपासून त्यांचा सराव करायला सुरुवात करा.

मला खात्री आहे 'शिकणं' हे कंटाळवाणं न होता आनंददायी, मजेने होईल आणि मग परीक्षेपुरते, परीक्षेपर्यंतच शिकण्याची तुमची प्रक्रिया मर्यादित राहाणार नाही, तर उलट कधी एकदा सुट्टी मिळेल आणि मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठी, शिकण्यासाठी मला वेळ मिळेल, असं तुम्हाला होईल. तुम्हाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी तुम्हाला खूप शुभेच्छा! तुमचे अनुभव, अडचणी आणि पुढची तंत्रे समजून घेण्याची उत्सुकता माझ्यापर्यंत नक्की पोहोचवा!

– **महेन्द्र सेठिया**, संपादक, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०
jpmahen@gmail.com

**श्रद्धांजली : जमशेद इराणी**, उद्योगपती, झारखंड – मृत्यू : ३१ ऑक्टोबर २०२२

# उमलणारी फुले

**साहित्य :** पसरट भांडे, पाणी, कात्री आणि वर्तमान पत्र इ.

**कृती :** १. खालील चित्र क्र. १ मध्ये दाखवल्याप्रमाणे वर्तमान पत्र लहान - मोठ्या फुलांच्या आकारात कापून घ्या, फुलांच्या पाकळ्या लांब असाव्यात. (चित्र क्र. १)

२. कागदी फुलांच्या पाकळ्या आतमध्ये दुमडून घ्या. (चित्र क्र. २)

३. पसरट भांड्यात पाणी घ्या.

४. पाकळ्या दुमडलेली फुले भांड्यातील पाण्यावर अलगद ठेवा.



चित्र क्र. १



चित्र क्र. २



चित्र क्र. ३

**निरीक्षण :**

१. पाण्यावर अलगद ठेवलेली फुले काही क्षणातच उमलली. (चित्र क्र. ३)

**असे का?**

- कागद तंतुपासून तयार झालेला असतो.
- या तंतुंच्या दरम्यान अगदी बारीक, केसांच्या आकाराच्या नलिका असतात.
- कागद जेव्हा पाण्याच्या संपर्कात येतो तेव्हा पाण्याच्या पृष्ठीय ताणामुळे पाणी कागदांच्या नलिकांमध्ये शिरते आणि कागदी फुले उमलताना दिसतात.
- याला 'केशिया क्रिया' (Capillary Action) म्हणतात.

**हे करा :**

१. वेगवेगळ्या प्रकारच्या कागदापासून बनवलेली फुले उमलण्यास लागणारा कालावधी सारखाच असतो का ते पाहा.

जरूर पाहा - चित्रफीत
मिठाचे ७ सोपे विज्ञान प्रयोग

- प्रितेश लोले
pritesh.lole09@gmail.com

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य प्रकाशने

**तज्ज्ञ लेखक, समृद्ध आशय, आकर्षक छपाई, माफक किंमत**

मुलांचे भावविश्व आणि विचारविश्व समृध्द करणारे संग्राह्य कथासंग्रह! रशियन अनुवादित कथा, हळुवार नात्यांचा गोफ उलगडणाऱ्या भावकथा, प्रेरक कथा, रहस्य आणि साहस यांचा मिलाफ असणाऱ्या उत्कंठावर्धक कथा, कल्पना आणि वास्तव यांचं अनोखं मिश्रण असणाऱ्या अद्भूत कथा!

प्रथितयश लेखकांनी लिहिलेली ही पुस्तके अवश्य संग्रही ठेवावीत अशीच आहेत!!

खालील पुस्तके खरेदी करण्यासाठी **www. jpprakashane.org** या संकेतस्थळाला आवश्य भेट द्या!!




**'छात्र प्रबोधन'**

**मासिकातील साहित्यातून प्रकाशित झालेले**

## कथासंग्रह

**विशेष पुरस्कार**
**'किमयागार'**
या कथासंग्रहाला
राज्य पुरस्कार
मिळाला आहे.

✻ वरील कथासंग्रहांचे मान्यवर लेखक ✻

✻ डॉ. वर्षा जोशी ✻ नीलिमा करमरकर ✻ सुहासिनी देशपांडे ✻ वि.वि. पेंडसे
✻ भारत सासणे ✻ अनु. अनघा–भट–बेहेरे ✻ कविता मेहेंदळे ✻ आश्लेषा महाजन

**www. jpprakashane.org** या संकेतस्थळावर त्या-त्या पुस्तकाचा परिचय snippet द्वारे पाहा व पुस्तके खरेदी करा.

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य प्रकाशने

तज्ज्ञ लेखक, समृद्ध आशय, आकर्षक छपाई, माफक किंमत

वैशिष्ट्यपूर्ण, खुमासदार शैलीतले, आवर्जून संग्रही ठेवावेत असे ललित लेख संग्रह!
निसर्गपर, स्मरणरंजन, संस्कारक्षम लेख, नाट्यछटा, पर्यावरण, बालपणीचे अनुभव यांची रंजक आणि मनोज्ञ सफर हे ललित लेख संग्रह करून देतात. स्वतःचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देणारे, स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करणारे ललित लेख संग्रह तुम्ही वाचा, भेट द्या!
खालील पुस्तके खरेदी करण्यासाठी **www. jpprakashane.org** या संकेतस्थळाला अवश्य भेट द्या!!

**विशेष पुरस्कार**
**'अंधाराचे डोळे'**
या ललित संग्रहाला
महाराष्ट्र साहित्य परिषदेचा
(२०२२) पुरस्कार प्राप्त!



- अंधाराचे डोळे
- आस्वाद बहुरंगी साहित्याचा
- बकुळफुलं
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]



## 'छात्र प्रबोधन'
### मासिकातील साहित्यातून प्रकाशित झालेले संग्राह्य

# ललित लेख संग्रह

ललित संग्रहांचे लेखन/संपादन करणारे मान्यवर

लेखक - [illegible] • शैलजा देशमुख • प्रवीण दवणे
संपादक - [illegible] कुलकर्णी • माधवी [illegible] • वर्षा कुलकर्णी

**www. jpprakashane.org** [illegible] snippet [illegible]

जरूर पाहा : गरडी (पुदुचेरी) - या नृत्याचे मूळ पौराणिक असून ते सर्व सणांमध्ये सादर केले जाते.

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य प्रकाशने

तज्ज्ञ लेखक, समृद्ध आशय, आकर्षक छपाई, माफक किंमत

आपल्या शरीराची, मनाची, बुद्धिची ओळख करून घेऊन त्यांचा विकास कसा करायचा?
सकारात्मक भावनांची जोपासना कशी करायची?
एकूणच व्यक्तिमत्त्व विकासाबाबत स्वावलंबी होण्यासाठी मानसतज्ज्ञांची मार्गदर्शनपर पुस्तके!
शब्दांशी दोस्ती करत विविध साहित्यप्रकारात लेखन करण्याचे तंत्र आणि मंत्र सांगणारे,
नावीन्यपूर्ण कल्पना कशा काढायच्या आणि नवनिर्मितीच्या दिशेने जाण्यासाठी काय करायचे
इ. विषयक मार्गदर्शनपर पुस्तके. तसेच विविध स्फूर्तिगीते! स्वतःचा स्वतः **अभ्यास करण्यासाठीची तंत्र आणि कौशल्ये** कशी मिळवणार, सुंदर अक्षर येण्यासाठीची सराव पुस्तिका इ.
नियोजनाच्या विविध पायऱ्या, त्यातील बारकावे, सरावासाठी कृतिपाठ करून नियोजन कौशल्य
आत्मसात कसे करायचे यासाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी पुस्तक!



※ लेखक ※
※ डॉ. अशोक निरफराके
※ डॉ. नलिनी गुजराथी
※ प्राचा. स्वर्णलता भिशीकर
※ महेंद्र सेठिया
※ विवेक पोंक्षे
※ नचिकेत निसुरे
※ अशोक तातकमारे
※ डॉ. र. वि. नवाथे

※ संपादक ※
※ प्राचा. अनघा लवळेकर
※ प्राचा. प्रज्ञा कुलकर्णी

※ पुस्तके ※
※ व्यक्तिविकासासाठी विचारधन भाग १, २
※ कल्पक बनू या / Be Creative
※ पंख फुलवूया प्रतिभेचे
(हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेत आवृत्ती उपलब्ध)
※ तरंग मनाचे
※ भावनांच्या प्रांगणात
※ उजळली वाट
※ प्रबोधन गीते भाग १, २
※ गीता-गीताई
※ नियोजन कौशल्य
※ प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
※ चला प्रकल्प करू या!
(इंग्रजीतही उपलब्ध)
※ अभ्यासातील स्वावलंबन भाग १, ३
(भाग १ – अभ्यासाची पूर्व तयारी
भाग ३ – परीक्षा तंत्र)
※ असे घटते सुंदर अक्षर
※ त्रिमितीची किमया

व्यक्तिविकसनपर व अभ्यासविषयक पुस्तके

www. jpprakashane.org snippet

# ज्ञान प्रबोधिनी-छात्र प्रबोधनची खास कुमारांसाठी संग्राह्य पुस्तके

## समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!

वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३० ☎ ०२०– २४२०७१५४/१५५

ऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

भारत सासणे, प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन, सुहासिनी देशपांडे, अनघा भट–बेहेरे, कविता मेहेंदळे, मल्हार अरणकल्ले, शैलजा देशमुख, अशोक निरफराके, प्रकाश तुपे, नलिनी गुजराथी, वर्षा जोशी, अंजली कुलकर्णी, कांचनगंगा गंधे, वसंत गोवारीकर, वि. वि. पेंडसे, स्वर्णलता भिशीकर, दिलीप कुलकर्णी इ. मान्यवर लेखकांची दर्जेदार पुस्तके!

---

※ कथासंग्रह
- सफरांची–रशियन कथा ........ ३०
- राम आणि श्यामच्या अद्भुत साहस यात्रा ........ १६०
- प्रेरक कथा ........ ८०
- गुरू माय जशी होती ........ १६०
- अभिजयाच्या जादूसकथा ........ १००
- कहाणी दोन भावांची ........ ४०
- चिंटू चावला ढोऽऽ आणि इतर कथा ........ १३०
- चलो मिशिगंक आणि इतर अद्भुत कथा ........ १२०
- किमयागार ........ १८०
- तू मोठा कधी रे झालास? ........ ११०
- **When Goodness Prevails** ........ १६०


※ ललित लेखसंग्रह
- बकुळफुलं ........ ६०
- सिद्धीची गुरुकिल्ली ........ १००
- अंधाराचे डोळे ........ ११०
- कागदी होड्या ........ १३०



※ कविता, काव्यपंक्ती संग्रह
- कवितेच्या गावा ........ ३०
- शब्दांची रत्ने ........ ६०
- जपून ठेवू सृष्टी, नाती ........ ८०

※ रसग्रहणात्मक लेखसंग्रह
- गंध मोहरी काव्याचा भाग १ व २ (प्रत्येकी) ........ ७०
- काव्यगंधाची रसयात्रा ........ १२०
- आस्वाद बहुरंगी साहित्याचा ........ १२०
- पाहिलेच पाहिजे असे काही भाग १/२ ........ ८०/१००
- वाचलेच पाहिजे असे काही भाग १,२,३ (प्रत्येकी) ........ ४०

※ माहितीपर पुस्तके
- आपला पाऊस ........ ३०
- चला आकाश दर्शनाला ........ १००
- वनस्पतींचे अनोखे विश्व ........ ८०
- दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञान ........ १५०
- मैत्री आयुर्वेदाशी ........ १००

※ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके
- कल्पक बनू या/**Be Creative** ........ १००/१५०




- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ........ ७०
- नियोजन कौशल्य ........ ५०
- तरंग मनाचे ........ १३०
- उजळली वाट ........ ४०
- पंख फुलवूया प्रतिभेचे मराठी/हिंदी/गुजराती आवृत्ती – प्रत्येकी ........ २५०
- **Let's Unfold the Wings of Creativity** ........ ३००
- भावनांच्या प्रांगणात ........ १३०
- गीत–गीताई ........ ३०
- प्रबोधन गीते भाग १/भाग २ ........ ६०/५०


※ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके
- जिद्दीची नोबल स्वप्ने ........ १५०
- आयुष्यातील वाटचालीसाठी ........ १२०
- आम्ही असे घडलो ........ १६०
- आमची जडणघडण ........ १६०
- ध्यासपंथावरील दीपस्तंभ ........ १४०
- कथा इस्रोची ........ १२०
- हरिसिंह नलुआ ........ ६०
- गोष्टीरूप आप्पा/आपले आप्पा (कॉमिक) ........ ५०
- समाजशिल्पी आप्पा ........ ८०

※ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह
- स्वीकारातील स्वदेशी ........ ०
- हरित संदेश/ **Green Messages** ........ ३०/२०
- हट्टी का हट्टी ........ ७०

※ अभ्यासविषयक पुस्तके
- असे घडते सुंदर अक्षर ........ २५
- अभ्यासातील स्वावलंबन
  - भाग १ – अभ्यासाची पूर्वतयारी ........ ७०
  - भाग ३ – परीक्षा तंत्र ........ ८०
- चला प्रकल्प करूया ........ २००
- **Learning to Explore: Project by Project** ........ २००

※ कलाकृतिपर पुस्तके
- त्रिमितीची किमया/ **3D Magic** ........ ८०/१४०
- कागदी हस्तकलेच्या दुनियेत ........ ५०
- हस्तकलेचा उत्सव ........ ७०
- कलेच्या विश्वात ........ ७०
- अभिवाचन एक कला ........ ७०



पुस्तकांचा परिचय जाणण्यासाठी व ऑनलाइन खरेदीसाठी.

ज्ञान प्रबोधिनीतर्फे पालक व शिक्षकांसाठी इतरही अनेक पुस्तके प्रकाशित

ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन

## मैत्री पुस्तकांशी! जल्लोष वाचनाचा!

**एक पानी लॅमिनेटेड ४० पुस्तकांचे २ संच**

- **ललित लेखांचे संच –**
  २५ लेखकांचे ४० ललित लेख
- **कर्तृत्वाच्या कहाण्यांचा संच –**
  ४० व्यक्तींच्या कर्तृत्वाच्या कहाण्या



**सवलत मूल्य प्रत्येकी रु. ५००**

(मूळ किं. रु. ८००) + वितरण खर्च

**६ पानी ४० पुस्तकांचा 'कथा–कविता'संच**

- ➢ ६२ लेखकांच्या ८० कथा
- ➢ ३३ कवींच्या ४० कविता
- ➢ १३ पुस्तकांचा परिचय

(अवघड शब्दांचे अर्थ त्या त्या पानांखाली!)




**सवलत मूल्य प्रत्येकी रु. ६००**

(मूळ किं. रु. १०००) + वितरण खर्च

**१० पुस्तकांचा संच सवलत मूल्य रु. २०० + वितरण खर्च**

ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन

## कर्तृत्वाच्या प्रेरणादायी कहाण्या!















**विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींच्या जडणघडणीच्या प्रेरणादायी कहाण्या!**

ऑनलाइन jpprakashane.org वर अथवा प्रत्यक्ष आजच खरेदी करा व सवलत मिळवा!

संपर्क : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०, फोन नं. ०२०–२४२०७ १७४/१७५

## सफर दिवाळी विशेषांकाची - 'छात्र प्रबोधन'तर्फे वैयक्तिक स्पर्धा

**(इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी, प्रवेश नि:शुल्क)**

**या अंकावर आधारित प्रश्न खाली देत आहोत. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी!**

**त्या प्रश्नांची उत्तरे लिहून 'छात्र प्रबोधन'कडे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत पाठवा.**

**बक्षिसे : विशेष गुणवत्ताप्राप्त पहिल्या २० जणांना प्रत्येकी एक वर्षाची वर्गणी!**

(उत्तरे पाठवताना नाव, पत्ता, मोबाईल संपर्क, शाळा, इयत्ता, इ–मेल लिहिणे आवश्यक.)

१. 'बालवीर नारायण दाभाडे' यांनी कोणते अलौकिक शौर्य दाखवले ?

२. दृश्य कलेतील एखादी कलाकृती बघताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात? (संदर्भ लेख : चित्र समजून घेताना)

३. ऋजुताने 'खऱ्या खबरीचा शोध' कसा घेतला?

४. 'पार्वताईच अंगण' पोरांना सर्वाधिक प्रिय का होतं?

५. गणेश हिंगमिरे यांची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये तुम्हाला भावली?

६. सॅल्मनचा जीवन प्रवास खडतर व अद्भुत का गणला जातो?

७. नील आणि निखिलचे घट्ट भावबंध 'दादा' या कथेत कसे दिसून येतात?

८. कवीच्या कल्पनेचा कुंचला कोणकोणत्या करामती दाखवतो? (संदर्भ कविता : नवे आकाश नवा सूर्य)

९. 'भाखा' हे लोकसंगीत कोणत्या राज्याचे आहे ?

१०. दिवाळी अंकाबाबतची तुमची प्रतिक्रिया व पुढील वर्षाच्या दिवाळी अंकाबाबतच्या अपेक्षा कळविण्यासाठी संपादकांना १००–१५० शब्दांचे पत्र लिहा.

करूनी पराक्रम तुम्ही दिले, तेज नव्या युगाचे । झेप घेऊन पुढे चालले, संशोधक भारताचे ।।

## ज्ञान प्रबोधिनी – छात्र प्रबोधन, पुणे व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा !
# सुप्त गुणांना गटकार्याद्वारे अभिव्यक्त होण्याची संधी !!



**कोणासाठी – वयोगट : इ. ६ वी ते १० वी, विद्यार्थी संख्या : ६ ते ८ विद्यार्थ्यांचा एक गट.**
(विद्यार्थीगट शाळेतर्फे किंवा वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थी स्वतंत्रपणे गट करून सहभागी होऊ शकतील.
एका शाळेतील जास्तीत जास्त तीन गट सहभागी होऊ शकतात.)

## १. अभिवाचन स्पर्धा (६ वे वर्ष)

- कोणत्याही एका विषयावर 'छात्र प्रबोधन' मासिकातील साहित्यातून विविध साहित्य प्रकारांची निवड करावी. (छात्र प्रबोधनचे ३०० पेक्षा अधिक अंक संकेतस्थळावर मोफत उपलब्ध! छापील अंक नाममात्र किमतीत उपलब्ध!)
- ते साहित्य एकत्र गुंफून एकसंध संहिता तयार करावी.
- गटाने त्याचे ३० मिनिटांचे अभिवाचन करावे.
- त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग गुगल ड्राईव्हद्वारा खालील इ-मेल वर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत पाठवावे.

'तुम्हीच संपादक व्हा!'

## २. हस्तलिखित स्पर्धा (११ वे वर्ष)

- हस्तलिखित ४८ ते ५६ पृष्ठसंख्येचे असावे.(मुखपृष्ठ सोडून)
- ९०% लेखन विद्यार्थ्यांचे असावे. १०% संकलन चालेल.
- मुखपृष्ठ, चित्रे, सजावट विद्यार्थ्यांनीच केलेली असावी.
- विषयांचे व लेखनप्रकारांचे वैविध्य असावे. काही साहित्य प्रकारांचा समावेश हस्तलिखितात असणे बंधनकारक!
- खालील संपर्क पत्त्यावर हस्तलिखित पाठविण्याचा अंतिम दिनांक : ३१ डिसेंबर २०२३
- स्पर्धेचे तपशील खालील QR Code स्कॅन करून पाहा.

## दोन्ही स्पर्धांसाठीचे सामाईक तपशील

गुगल फॉर्म

नावनोंदणी : स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही. मात्र शेजारील QR Code स्कॅन करून त्यावरील गुगल फॉर्म ३० नोव्हेंबरपूर्वी भरून नोंदणी करणे आवश्यक! स्पर्धेबाबतचे अन्य तपशील, मूल्यमापनाचे निकष 'स्पर्धा तपशील' हा QR Code स्कॅन करून समजून घ्यावेत.

कार्यशाळा : गुणवत्ता वाढण्यासाठी दोन्ही स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांसाठी डिसेंबर महिन्यात दीड तासाच्या २ ऑनलाइन कार्यशाळा होतील.
स्पर्धेला अनुसरून तज्ज्ञांचे मार्गदर्शन व गटशः सराव असे कार्यशाळेचे स्वरूप असेल.

बक्षीस योजना :
- प्रथम : ₹ ४,०००, द्वितीय : ₹ ३,०००, तृतीय : ₹ २,५००(+ सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक)
- तीन उत्तेजनार्थ पुरस्कार : प्रत्येकी ₹ १,५०० (+ प्रशस्तिपत्रक)
  (किमान गुणवत्तेच्या वर असतील तरच वरील क्रमांक काढले जातील.)
  वरील बक्षिसाच्या रकमेपैकी रु. ५००/- शाळेला/संघांना झालेल्या खर्चापोटी रोख व उर्वरित रकमेची पुस्तके पाठवली जातील.
- या व्यतिरिक्त किमान गुणवत्तेच्यावरील सर्व गटांना प्रशस्तिपत्रक व रु. ५०० चा पुस्तकसंच भेट
  (निव्वळ सहभागाचे प्रमाणपत्र नसेल.)

स्पर्धा तपशील

मोठ्या संख्येने सहभागी व्हा !

संपर्क : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०, फोन नं. ०२०-२४२०७ १४४/१४५
संकेतस्थळ – www.chhatraprabodhan.org इ–मेल – abhivachanspardha23@gmail.com

नव्या शतकाची, नवी नवी आव्हाने । विज्ञानाने उघडली, नवी संशोधन दालने ।।

# आजची ज्ञान प्रबोधिनी - शके १९४५ (इ. स. २०२३)

केंद्रे – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी
उपकेंद्रे – साळुंब्रे, शिवापूर, वेल्हे, शिरवळ
विस्तार केंद्रे – अंबाजोगाई, डोंबिवली
उपक्रम केंद्रे – आंबवणे, चिखली (जि. पुणे)
कार्यक्षेत्रे – शिक्षण, संशोधन, प्रदेश विकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता
संपर्क केंद्रे – ठाणे, चिपळूण, बदलापूर

## १. शिक्षण

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
संकेतस्थळ : prashala.jnanaprabodhini.org

२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल)
संकेतस्थळ : jpnvnigdi.org

३. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

४. शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर

५. ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे (माध्यमिक, सहनिवास)

६. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, हराळी (प्राथमिक, माध्यमिक, सहनिवास) संकेतस्थळ : jpharali.org

७. कृषी पदविका महाविद्यालय, हराळी

८. शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे (बुद्धिमत्ता संवर्धन)
संकेतस्थळ : jpearc.org

९. बा. बा. तांबेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र

१०. शैक्षणिक साधन केंद्र, पुणे (शैक्षणिक अॅप इ. निर्मिती)
संकेतस्थळ : jperc@jnanaprabodhini.org

११. छात्र प्रबोधन, पुणे (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
संकेतस्थळ : chhatraprabodhan.org

१२. पूरक शिक्षण प्रकल्प – पुणे, डोंबिवली, बोरीवली, ठाणे बदलापूर, अंबाजोगाई, हराळी, चिपळूण (विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

## २. संशोधन

१. प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे (संशोधन, प्रशिक्षण, बुद्धिमापन, संवर्धन, समुपदेशन, शैक्षणिक)
संकेतस्थळ : jpip.org

२. संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, व्याख्याने, अभ्यासगट)
संकेतस्थळ : santrika.org

प्रबोधिनीची अधिक माहिती देणारी संक्षिप्त चित्रफीत

## ३. प्रदेश विकसन

१. नैसर्गिक संसाधने विकास विभाग– गुंजवणी खोरे, हराळी, अंबाजोगाई (पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

२. स्त्री शक्ती प्रबोधन– शिवगंगा व गुंजवणी खोरे (बचत गट, आरोग्य, किशोरी–युवती–महिला विकास, स्वयंरोजगार)

३. कौशल्य प्रशिक्षण केंद्र – शिवापूर

४. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, साळुंब्रे

५. सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई

## ४. आरोग्य

१. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व्यवस्थापन, पुणे
संकेतस्थळ : dmhospital.org

२. कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ (नियमित तपासणी, शिबिरे, शस्त्रक्रिया)

## ५. नेतृत्व संवर्धन

१. युवक विभाग – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी

२. युवती विभाग – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी, अंबाजोगाई

३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे (प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)
संकेतस्थळ : www.jpnetrutwavikas.org

४. स्पर्धात्मक अभिवृत्ती संवर्धन केंद्र, पुणे
(केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

## ६. स्त्री शक्ती प्रबोधन

संवादिनी – पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर (समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम, विद्याव्रत)

## ७. राष्ट्रीय एकात्मता

१. नागरी वस्ती अभ्यासगट, पुणे

२. ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)

३. ज्ञानसेतू प्रकल्प
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू आणि काश्मिर)

४. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र (व्याख्याने, अभ्यासगट, मुस्लिम महिला विषयक अभ्यास प्रकल्प)

## ८. सामाजिक उद्योजकता

उद्योजकता विकास केंद्र, पुणे

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३० ☎ ०२०–२४२०७००० संकेतस्थळ : jnanaprabodhini.org
Email : contact @jnanaprabodhini.org

नसानसात धैर्य खेळे, वज्रबाहू अमुचा । शक्ती युक्ती सामर्थ्याने, वेध घेऊ शत्रूचा ॥

# ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

## पहिली ते पाचवीतील बालगटासाठी

१) बालविकास शिबिरे, निरंतर विकास कार्यक्रम - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - ८३९०९९८२६३/ २४२०७११८
२) पाचवी प्रवेश-पुणे-ज्ञान प्रबोधिनी प्रशाला-२४२०७१२१, निगडी- गुरूकुल, क्रीडाकुल- २७१६८०००
३) ओळख स्पर्शाची - लैंगिकता दुर्वर्तन जाणीव जागृती अभियान - द्वारा संवादिनी - २४२०७२२२

## सहावी ते बारावीपर्यंतच्या किशोर-कुमारांसाठी

१) क्षमता संवर्धन शिबिरे, कुमार विकास कार्यक्रम, बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी वर्षभर 'प्रज्ञा प्रबोधन वर्ग' - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७११८
२) क्रीडा-विज्ञान-कला दले-सुट्टी शिबिरे-द्वारा युवक विभाग- स्वप्नील - ९१३०५८६५४५, युवती विभाग-प्रज्ञा- ८९८३४०१५०७
३) छात्र प्रबोधन मासिक, उपक्रम, स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा, सुट्टीत 'प्रबोधन ऐपावाक' (ऐका, पाहा, वाचा, करा) तसेच वर्षभर 'प्रबोधन विकासिका' उपक्रम! - द्वारा छात्र प्रबोधन - २४२०७१७४/१७५
४) नागरी वस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - द्वारा नागरी वस्ती अभ्यास गट - हर्षाताई - ९४०३८५२७७४/२४२०७२२१
५) मानसपट मापन-(i-Tap)(५वी ते ९वी), अभिक्षमता मापन व व्यवसाय मार्गदर्शन-(१०वी/१२वी)-द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१३७
६) सामूहिक विद्याव्रत संस्कार - द्वारा संवादिनी - २४२०७२२२, संत्रिका - २४२०७१४६
७) 'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन)- द्वारा संवादिनी - ९९७०१५३२३७
८) अभ्यासपूरक शिक्षण, विद्याव्रत पूर्वतयारी व पाठपुरावा, जीवनकौशल्ये यांच्या शाळांमध्ये तासिका - द्वारा संवादिनी- २४२०७२२२
९) विविध कौशल्यांचे प्रशिक्षण, प्रज्ञा विकास कार्यक्रम, छोटे सायंटिस्ट उपक्रम - द्वारा शैक्षणिक उपक्रम संशोधिका - २४२०७ १३९/१३८
१०) शैक्षणिक चित्रफिती (Video) - You tube/ ERCJPP - द्वारा शिक्षण साधन केंद्र - २४२०७१९६

## पदवीपूर्व व पदव्युत्तर युवक-युवतींसाठी

१) Preparatory & Foundation Course - पदवीपूर्व गटासाठी UPSC पूर्वतयारीचा २ वर्षांचा अभ्यासक्रम, सामाजिक नेतृत्व पायाभरणी वर्ग (प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी)-द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र- २४२०७१७९
२) पदव्युत्तर गटासाठी UPSC परीक्षा पूर्वतयारी वर्ग - द्वारा स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र - २४२०७१३४
३) पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका- २४२०७१४५
४) अभ्यासगट, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, विज्ञान दल, कला दल, नागरी वस्ती व ग्रामीण प्रज्ञा कार्यक्रमात सहभाग द्वारा युवक विभाग - अथर्व - ९७६४८१४४५२, २४२०७१७७ - युवती विभाग - प्रज्ञा-८९८३४०१५०७/२४२०७१४८
५) ज्ञानसेतू - देशाच्या दुर्गम भागात विज्ञानविषयक उपक्रमांमध्ये सहभाग - शैक्षणिक उपक्रम संशोधिका - २४२०७१३८
६) अभ्यासपूर्ण व्याख्यानमाला - आंतरविद्याशाखीय व्याख्यानमाला व अभ्यासगट - द्वारा संत्रिका - २४२०७१८७
७) मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम-१. शालेय मानसशास्त्र २. प्रज्ञावंतांचे शिक्षण ३. बाल-कुमारांचे मानसशास्त्र (पत्राद्वारे) - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७२२८/२४२०७२२५
८) तरुणाईची आव्हाने - जीवनकौशल्य प्रशिक्षण - द्वारा संवादिनी - २४२०७२२२
९) उद्योजकता मार्गदर्शन - द्वारा उद्योजकता विकास केंद्र - २४२०७०००

## प्रौढ गटासाठी

१) संवादिनी - स्वयंविकासातून समाज परिवर्तन या हेतूने महिलांसाठी दरमहा कार्यक्रम - द्वारा संवादिनी - २४२०७२२२
२) पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग - द्वारा संस्कृत संस्कृति संशोधिका - २४२०७१४७
३) शिक्षक प्रशिक्षण - द्वारा वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र - २४२०७१२७
४) प्रबोधन संवादक - सजग पालकांसाठी व प्रबोधन दूत - धडपडणाऱ्या शिक्षकांसाठी द्वारा छात्र प्रबोधन - २४२०७१७४
५) बहर जोपासताना - किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी - द्वारा संवादिनी - २४२०७२२२
६) बुद्धिमान मुलांच्या पालकांसाठी स्व-मदत गट 'प्रज्ञा मैत्र'- द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७११८
७) कुटुंब/वैवाहिक/अन्य वैयक्तिक समस्यांसाठी समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४५
८) मानसशास्त्राशी व त्याच्या उपयोजनाशी निगडित विविध प्रशिक्षण वर्ग- द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४२

**याशिवाय संग्राह्य प्रकाशने, विविध संस्कार व पूजांचे अर्थपूर्ण पौरोहित्य, मानसशास्त्रीय चाचण्या व समुपदेशन इ. अनेक सेवा उपलब्ध.**

**पुण्याव्यतिरिक्त ज्ञान प्रबोधिनीच्या खालील केंद्र-उपकेंद्र-विस्तारकेंद्रांवरही विविध उपक्रम योजले जातात.**

**निगडी** - ०२०-२७१६८०००, **साळुंब्रे** (जि. पुणे) - ०२११४-२८७२९०, **सोलापूर** - ०२१७-२३१७७८२,
**हराळी** (जि.धाराशिव) - ८८८८०२६३८, **अंबाजोगाई** (जि. बीड)- ९४२३४७१०७०,
**बोरीवली** (मुंबई)- ९९६९०५१५७३, **डोंबिवली** (जि. ठाणे)-९१६७७५०६१९

**मुख्य कार्यालय - ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, दूरभाष - ०२० - २४२०७०००**
**संकेतस्थळ -** www.jnanaprabodhini.org

**जरूर भेट द्या : जंतरमंतर तारांगण** (दिल्ली) - येथे १३ वास्तूशास्त्रीय खगोलशास्त्र उपकरणे आहेत.

# आव्हानांच्या गगनामध्ये



आव्हानांच्या गगनामध्ये
मुक्त आम्ही फिरणार
कर्तृत्वाचे पंख आमुचे
कधीच ना थकणार ॥ ध्रु. ॥

अभ्यासाशी दोस्ती करूनी
हिरव्या डोंगरवाटा फिरूनी
चुस्त तनाने मस्त मनाने
गीत नवे रचणार ॥ १ ॥

प्रतिभाशाली प्रज्ञा अमुची
ज्योत अंतरी विश्वासाची
शास्त्र कलांची करून साधना
वीरव्रती बनणार ॥ २ ॥

असोत रस्ते बिकट, वाकडे
परंपरांची अंध झापडे
जन्मजात भेदांच्या सीमा
उल्लंघून जाणार ॥ ३ ॥

एकाकी ही वाट नसावी
सन्मित्रांची साथ असावी
स्वप्न उद्याचे सत्य बनविण्या
शर्थ आम्ही करणार ॥ ४ ॥

या पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

– वाच. अनघा लवळेकर

**पद्याचा भावार्थ :** विद्यार्थी दशेमध्ये विविध आव्हानांना जिद्दीने सामोरं जाण्याची उमेद मनात असेल तरच वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजवणं शक्य असतं. त्यासाठी अभ्यास तर करायला हवाच; पण वेगवेगळे अनुभव घेण्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात भटकलं, तर आपल्या संवेदना तल्लख होतात; शरीर सतेज, तेजस्वी होते आणि मनही ताजेतवाने होते.

बुद्धीला कल्पकतेची जोड मिळाली, विज्ञान तंत्रज्ञान, विविध कला, भाषा वाङ्मय यांचा अभ्यास केला, तर मनात आत्मविश्वास जागा होतो. पराक्रम गाजवण्याची जिद्द निर्माण झाली की, आपोआपच वीरवृत्तीची जोपासना व्रत म्हणून करण्याचे बळ येते.

वाट कितीही अवघड असली, रूढी-परंपरांची बंधने अडथळा बनली, विविध पातळ्यांवर अन्यायाला, जात-लिंगभेदाला सामोरे जावे लागले, तरीही जिद्दीने मात करून पुढे जाता येते. या पद्यात, 'हे सर्व आम्ही साध्य करू' हा विश्वास व्यक्त झाला आहे. 'एकच ध्येय असलेले मित्र या अवघड प्रवासात साथीला असले, तर उज्ज्वल भविष्याचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करू,' असा अत्यंत आशावादी संकल्प प्रस्तुत पद्यात मांडला आहे.

ज्ञान प्रबोधिनी
छात्र प्रबोधन
दिवाळी अंक २०२३
कल्पक भेट!

**बहुउपयोगी 'संकल्प फलक'**



शुभ दीपावली!

**छात्र प्रबोधन**

वार्षिक वर्गणी रु. २५०/-
**आजच सभासद व्हा!**

छात्र प्रबोधन-ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.
(०२०)२४२०७ १७४/१७५
ऑनलाइन नोंदणीसाठी
www.jpprakashane.org

# माझे संकल्प ॐ माझा विकास



## संकल्प व्यायामाचे



## अनुभव, भटकंती



## छंदांची जोपासना



## कृतीतून स्वावलंबन



## ध्यास वाचनाचा




## स्पर्धांमधला सहभाग

वाचन आहे प्रवास सुंदर,
नव्या नव्या ज्ञानाचा
इतिहासाचा, साहित्याचा
आणिक विज्ञानाचा!

छात्र प्रबोधन, पुणे ३०
पुस्तक खूण

**'बहुउपयोगी संकल्प फलक' तयार करण्याची कृती :** १) प्रथम दोन्ही पाने अंकातून फाडून घ्या. २) पृष्ठ क्र. १ वर बाहेरील ठळक रेषेवरून फलक कापून घ्यावा. खाली दिलेली पुस्तक खुण कापून घ्या. अंक/पुस्तके वाचताना वापरा. ३) पृष्ठ क्र. ३ वर एकूण ३ आकृत्या आहेत. या तीनही आकृत्या बाहेरील ठळक रेषेवरून कापून घ्या व तुटक रेषांवर कर्कटक फिरवून त्या दुमडून घ्या. ४) आकृती १ मधून तयार झालेल्या चार बाजू असलेला चौकोनी ठोकळा पृष्ठ १ मधील कापलेल्या फलकाच्या खालील बाजूला बाहेरून पांढऱ्या पट्ट्यांच्या (चिकटपट्ट्या) साहाय्याने फेव्हिकॉल वापरून चिकटवून घ्या. फलकाच्या तळाशी वरील बाजूस मोकळा असलेला खोका (बॉक्स) तयार होईल. वरील बाजूला असलेल्या चिकटपट्ट्या कडेवरच आतमध्ये दुमडून चिकटवा, त्यामुळे खोक्याच्या कडा भक्कम होतील. पुढील पायरीसाठीही ही कृती करा. ५) आकृती २ मधून तयार झालेला, तीन बाजू असलेला चौकोनी ठोकळा पृष्ठ १ मधील चौथ्या पायरीत तयार झालेल्या आडव्या खोक्यात डाव्या बाजूला (छात्र प्रबोधन व शुभ दीपावली लिहिलेल्या मजकुराच्या खाली) उभा चिकटवून घ्या. पेन, पेन्सिल, रंगवायचा ब्रश इ. ठेवण्यासाठी याच्या वापर करू शकाल. ६) आकृती ३ मधून २ पट्ट्या तयार होतील. त्या तुटक रेषांवर दुमडून रंगीत बाजू बाहेर ठेवून आतून चिकटवून घ्या व चिकटपट्टीच्या साहाय्याने पायरी ४ मधील तयार झालेल्या आडव्या खोक्याच्या मध्ये सारख्या अंतरावर चिकटवून घ्या. यातून तुमचे खोक्याचे ३ कप्पे तयार होतील टाचण्या, पिना, रबरबँड, खोडरबर इ. गोष्टी ठेवण्यासाठी याचा वापर करू शकाल. ७) **हा तुमचा 'बहुउपयोगी संकल्प फलक' तयार झाला.** सहा प्रकारांमधील एकेक संकल्प विचार करून निश्चित करा आणि तो त्या त्या संकल्पाच्या ठिकाणी लिहा. येत्या वर्षभरात ते संकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. ८) संकल्प फलक जाड, भक्कम होण्यासाठी तुमच्याकडील जुन्या वहीचा, खोक्याचा पुठ्ठा फलकाला खालच्या व मागच्या बाजूने चिकटवा. हा फलक तुमच्या खोलीत/घरात दर्शनी भागात भिंतीला लटकवा किंवा कपाटात/टेबलावर ठेवा.

**For English version of the procedure scan the QR code given on the next page.**




The procedure of this Diwali Gift in English



कृती ४ नंतर असे दिसेल



कृती ५ नंतर असे दिसेल



कृती ६ नंतर असे दिसेल